## विद्यार्थ्यांसाठी विज्ञान

# 'एनसीएल'चा विज्ञानप्रसार

## संस्थांसाठी प्रेरणादायी : संशोधन सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी कार्यक्रम

मयूरेश प्रभुणे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २७ : विद्यार्थ्यांना मूलभूत विज्ञानाकडे आकर्षित करण्यासाठी 'आयुका'पाठोपाठ आता राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) 'विज्ञान विस्तार कार्यक्रमा'(कम्युनिटी आउटरीच प्रोग्रॅम)च्या माध्यमातून विशेष प्रयत्न करणार आहे. जागतिक दर्जाच्या संशोधन संस्थांकडून वर्षातील मोजकेच दिवस विज्ञान प्रदर्शन, व्याख्यानांचे आयोजन करून औपचारिकता साधली जात असताना, प्रयोगशाळेतील संशोधन सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी 'एनसीएल'चा हा पुढाकार इतर संशोधन संस्थांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

मूलभूत विज्ञानाविषयी विद्यार्थी आणि पालकांमध्ये विशेष जागृती नसल्यामुळे करियरसाठी त्यांचा इतर शाखांकडेच कल असल्याचे दिसून आले आहे. मूलभूत संशोधन करणाऱ्या संस्थांनी त्यांच्या प्रयोगशाळेतील विज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत रंजक पद्धतीने पोचवले, तर त्या संस्थांकडे अधिकाधिक विद्यार्थी आकर्षित होतील. यासाठी सर्व संशोधन संस्थांमधून स्वतंत्र विज्ञान प्रसार कार्यक्रम सुरू करावा, अशी सूचना अनेक तज्ज्ञांकडून, तसेच विज्ञान परिषदांमधून करण्यात येते. मात्र, संशोधकांची कमतरता भेडसावत असतानाही अनेक संस्थांनी या सूचनेचे गांभीर्य लक्षात घेतलेले नाही. पुण्यात 'आयुका', मुंबईतील 'भाभा अणु संशोधन केंद्र' (बीएआरसी), 'टाटा मूलभूत संशोधन संस्था' (टीआयएफआर), बेंगळूरु येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स' आदी मोजक्याच संशोधन संस्थांकडून स्वतंत्र विज्ञान प्रसार कार्यक्रम राबवला जातो.

मात्र, 'एनसीएल'ने विज्ञान विस्तार कार्यक्रम सुरू करून ही कमतरता दूर करण्याच्या दिशेने ठोस पाऊल उचलले आहे. आठवी, नववीच्या विद्यार्थ्यांसाठी येत्या २८ सप्टेंबरपासून विज्ञान व्याख्यानमालेने त्याची सुरवात होत आहे. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहून पुढील उपक्रम राबवणार असल्याचे डॉ. पी. के. इंगळे यांनी सांगितले. व्याख्यानमालेसाठी मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश असून, नावनोंदणीसाठी (०२०) २५९०२१३२ या क्रमांकावर किंवा outreach@ncl.res.in या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

### प्रत्येक महिन्याला व्याख्यान

**'एनसीएल'मधील तज्ज्ञांची महिन्यातून एका रविवारी अशी आठ व्याख्याने प्रारंभी होतील. विज्ञान विस्तार कार्यक्रमातील 'भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणिताच्या साह्याने जीवशास्त्राचा अभ्यास' या विषयावर डॉ. चेतन गाडगीळ यांचे पहिले व्याख्यान होणार आहे. पाषाण रस्त्यावरील संस्थेच्या 'इनोव्हेशन पार्क'मध्ये हे कार्यक्रम होतील. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तज्ज्ञांशी संवाद साधता येईल.**